# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.03.2026** **वार: शनिवार**

---

1. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याला सरकारचं प्राधान्य असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. राज्यातल्या 91 लाख शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा बाविसावा हप्ता वितरित
3. महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक 2026 विधानसभेत सादर
4. अफवांवर विश्वास ठेऊन घरगुती गॅस सिलिंडर खरेदी करू नका-केंद्र सरकारचं आवाहन आणि
5. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज पावसाची शक्यता

**पंतप्रधान**

शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठीच्या उपक्रमांना आणि शेतीच्या आधुनिकीकरणाला सरकारचं प्राधान्य असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशभरातल्या लाभार्थ्यांना पीएम किसान योजनेच्या बाविसाव्या हप्त्याचं वितरण काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. केंद्र सरकारच्या शेतकऱ्यांसाठीच्या प्रयत्नांबद्दल मोदी म्हणाले....

**पीएम किसान सम्मान निधि के तहत ₹18, 000 करोड़ से अधिक की राशि हमारे करोड़ों अन्नदाताओं के खातों में भेजी गई है। ये योजना वाकई अद्भुत है। एक क्लिक से करोड़ों किसानों के बैंक खाते में सीधे पैसा जमा होता है। दुनिया के विकसित देशों में भी ऐसा संभव नहीं है।**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमात मुंबईतून दूरस्थ प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. देशातल्या 9 कोटी 32 लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात हा हप्ता, थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात आला. राज्यातल्या 91 लाख शेतकऱ्यांचा यात समावेश आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये एकंदर 1 हजार 837 कोटी रुपये जमा करण्यात आले. या योजनेचा लाभ मिळालेल्या अकोला जिल्ह्यातल्या लाभार्थीची ही प्रातिनिधिक प्रतिक्रिया....

**हे जे महाराष्ट्र शासनाचे सहा हजार रुपये आणि केंद्र सरकारचे जे सहा, सहा आणि सहा बारा हजार रुपये जे आमच्या खात्यामध्ये जमा होतात तर निश्चितच आमच्या शेतीकामासाठी किंवा जे काही कृषी अवजारं किंवा खते बी बियाणे घेण्यासाठी आम्हाला चांगले उपयुक्त ठरतात आणि ही एक योग्य वेळ आहे की गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर हे रक्कम आमच्या खात्यामध्ये जमा झाली निश्चितच याचा लाभ आम्हाला आमच्या शेतीकामासाठी होईल.**

**अर्थमंत्री**

कोणत्याही स्वरूपाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी केंद्र सरकार सज्ज असून, विविध प्रकारचे आर्थिक धक्के सहन करण्यासाठी देशाची अर्थव्यवस्था सक्षम असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल लोकसभेत, 2025-26या वर्षासाठी अनुदानाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देत होत्या. जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी सरकारने आर्थिक स्थिरीकरण निधी म्हणून 57 हजार 381 कोटी रुपयांचा प्रस्ताव ठेवल्याचं त्या म्हणाल्या. शेतकऱ्यांना खतांची टंचाई भासू नये, यासाठी खत अनुदानापोटी 19 हजार 230 कोटी रुपयांची रक्कम राखून ठेवण्यात आली आहे. जागतिक संकटाच्या काळात, प्रत्येक सदस्याने पक्षीय मतभेद बाजूला ठेऊन राष्ट्रीय हितासाठी काम केलं पाहिजे असं सीतारामन म्हणाल्या. पुरवणी मागण्यांच्या मंजुरीनंतर सभागृहाचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**विधीमंडळ**

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक 2026 काल विधानसभेत मांडण्यात आलं. धर्मस्वातंत्र्याचं रक्षण करणं, एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बेकायदेशीर धर्मांतराला प्रतिबंध करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट असल्याचं गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधेयक मांडताना सांगितलं. जबरदस्तीनं धर्मांतर घडवून आणणाऱ्या व्यक्तीला सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा आणि एक लाख रुपये दंड अशा शिक्षेची यात तरतूद आहे.

राज्यातल्या सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या बोर्डांच्या शाळांमध्ये मराठी भाषा विषय सक्तीचा करण्याची अधिसूचना लागू करण्यात आली आहे. ज्या शाळा या नियमाचं उल्लंघन करतील, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असं शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत सांगितलं. मराठी विषय शाळेत शिकवणं हा नियम केवळ शासकीय शाळांपुरता मर्यादित नसून खासगी, विनाअनुदानित आणि सर्व परकीय मंडळांच्या शाळांनाही लागू आहे. हा आदेश न मानणाऱ्या संस्थाची मान्यता रद्द करण्यात येईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. खासगी पूर्व-प्राथमिक शाळांची पोर्टलवर अनिवार्य नोंदणी, नियमन आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्याच्या उद्देशानं अधिनियम आणण्याची प्रक्रिया सुरु आहे, अशी माहितीही भुसे यांनी दिली.

दावोस इथल्या जागतिक आर्थिक परिषदेत झालेल्या करारांमधून राज्यात मोठ्या प्रमाणात परकीय थेट गुंतवणूक होत आहे. यावर्षी सुमारे 31 लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र सलग तीन वर्षे देशात अव्वल ठरल्याचंही त्यांनी नमूद केलं. राज्यात संतुलित औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी नवीन एम आय डी सी क्षेत्र उभारणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगारनिर्मिती वाढवणे यासाठी उद्योग विभाग सातत्यानं प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

केंद्र शासनाचे धोरण आणि राज्याची गरज यांचा मेळ घालून भविष्यात राज्याचं स्वतंत्र मोबाइल टॉवर धोरण तयार करण्याबाबत अभ्यास सुरु आहे अशी माहिती सामंत यांनी दिली. माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रधान सचिवांसोबत यासंदर्भात तातडीने बैठक आयोजित करण्यात येईल तसंच राज्यातल्या अनधिकृत मोबाईल टॉवर्सचं सर्वेक्षण करण्यात येईल असंही त्यांनी विधानसभेत सांगितलं.

पुण्यातल्या हिंजवडी आयटी पार्क परिसरातली वाहतूक कोंडी आणि अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे होणारं आयटी कंपन्यांचं स्थलांतर रोखण्यासाठी पुरंदर इथं आयटी पार्क उभारण्याबाबत शासन सकारात्मक आहे. महसूल विभागाची प्रक्रिया पूर्ण होताच, संबंधित जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरित करून, प्रकल्पाची कार्यवाही जलदगतीनं केली जाईल, अशी ग्वाही सामंत यांनी दिली.

**पेट्रोलियम मंत्रालय**

देशातली सर्व तेलशुद्धीकरण केंद्रं पूर्ण क्षमतेनं काम करत असून त्यांच्याकडे कच्च्या तेलाचा पुरेसा साठा आहे अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी दिली. देशांतर्गत पीएनजी आणि सीएनजीचा पुरवठा सुरळीत असल्याचं त्यांनी सांगितलं. पश्चिम आशियामधल्या घडामोडींबाबतच्या, आंतर मंत्रालयीन पत्रकार परिषदेत त्या काल बोलत होत्या. स्वयंपाकाच्या एलपीजी गॅस सिलिंडरबाबत त्या म्हणाल्या की चिंतेची बाब असली तरी देशातल्या सर्व 25 हजार वितरकांकडे सिलिंडर्स उपलब्ध आहेत आणि दररोज 50 लाख सिलिंडर्स वितरित केले जात आहेत.

एलपीजी सिलिंडर्सच्या तुटवड्याबाबत अफवा पसरवल्याने, घरगुती वापराच्या सिलिंडरच्या मागणीत सुमारे 25 टक्के वाढ झाली; अशा अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं. आत्ता एलपीजीचं देशांतर्गत उत्पादन 30 टक्क्यांनी वाढलं असल्याचंही त्यांनी सांगितलं.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय तसंच ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या सचिवांनी काल सर्व राज्यं, केंद्रशासित प्रदेशांमधल्या अन्न आणि नागरी पुरवठा मंत्रालयाच्या सचिवांची बैठक घेतली. सिलिंडर्सचा काळा बाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश यावेळी राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आले.

नागरिकांनी गॅस वितरण कंपन्यांच्या अधिकृत पोर्टल, एसएमएस, व्हॉटसॲप बुकिंग आणि मोबाइल ॲपवरुनच सिलिंडर बुक करावा असं आवाहन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव सेंथिल राजन यांनी केलं. अशा स्थितीचा, डिजिटल गुन्हेगार गैरफायदा घेऊ शकतात त्यामुळे काळजी घेण्याचं आणि केवळ तेल कंपन्यांच्या अधिकृत मंचावर सिलिंडर बुक करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**कुंभमेळा**

त्र्यंबक आणि नाशिकमध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनातून जगाला आकर्षण वाटणारा कुंभमेळा करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. सिंहस्थ कुंभमेळ्याकरता केल्या जात असलेल्या विविध कामांसाठी 22 हजार 181 कोटी रुपयांच्या कामांना, कुंभमेळा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. यामध्ये पहिल्या टप्प्यातल्या 5 हजार 140 कोटी आणि दुसऱ्या टप्प्यातल्या 17 हजार 41 कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

**पावसाचा अंदाज**

विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये येत्या 17 ते 20 मार्च दरम्यान प्रामुख्याने दुपारनंतर मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही असं हवामान विभागानं म्हटलं आहे. सध्याच्या अंदाजानुसार 18 ते 20 मार्च दरम्यान या हवामान घडामोडींची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावं आणि त्यानुसार शेतीच्या कामांचं नियोजन करावं. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्यानं शेतकऱ्यांनी काढलेली पिकं सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचं नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**हवामान**

राज्यात आज मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचे वारे वाहतील तर कोकणात तुरळक ठिकाणी वातावरण उष्ण आणि दमट असेल असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.